नि. फौजदारी खटला क्र. **११५/२०२३**
सरकार विरूद्ध अरविंद शेळके
**निशाणी १४**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : तेजस्विनी माताप्रसाद दोहरे,
वय : २६ वर्षे,
धंदा : गृहिणी,
राहणार : हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एल. हरणे यांचेमार्फत.**

मी अरविंद शेळके याला ओळखते. अरविंद शेळके हा मी बी. एससी ला असतांना गोपालराव खेडकर या महाविद्यालयात कारकुन म्हणुन कार्यरत होता. मी त्याला पाहिल्यास ओळखु शकते. आरोपी अरविंद शेळके हा न्यायालयात आरोपीच्या पिंज—यात हजर आहे. मी तेल्हारा येथे गोपालराव खेडकर महाविद्यालयात बी. एससी चे शिक्षण घेत होते. त्यावेळी आरोपीने मला त्रास दिला. त्यामुळे माझे वडिलांनी त्याला झाडले होते. आरोपी हा मला फोन कॉल करून काहीपण वाईट बोलायचा. आरोपी हा मला तुला भेटायचे आहे, तुझ्याशी बोलायचे आहे असे वाईट उद्देशाने बोलायचे आहे. मी माझे मैत्रिणीमार्फत त्याला समज देण्याचा प्रयत्न केला परंतु त्याने कॉल रिसीव्ह केला नाही. मी दर्यापुर रोड, अकोट येथील शिवाजी कॉलेज येथे एम.एससी करत होते. मी अकोट मध्ये आहे असे आरोपीला समजले असता, त्याने माझा कमल नेट कॅफे पासुन ते शिवाजी कॉलेज पर्यंत पाठलाग केला. आरोपीने माझा एक—दोन दिवस पाठलाग केला. त्याने मला एके दिवशी सकाळी ११:३० वाजेच्या दरम्यान त्याच रस्त्यावर नेट कॅफे जवळ अडवले. आरोपीने मला दि. ०१/०३/२०२३ रोजी अडवले होते. आरोपीने मला अडवुन तुझ्याशी बोलायचे आहे असे म्हटले. त्यामुळे मी घाबरले व कॉलेजला निघुन गेले. त्यानंतर मी घरी गेली व आई—बाबांना कळवले. त्यानंतर मी दुस—या दिवशी पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. घटनेदिवशी माझ्या महाविद्यलयाची वेळ उशिरापर्यंत असल्यामुळे तसेच मी घाबरलेली असल्यामुळे मी दुस—या दिवशी रिपोर्ट दिला. आता मला मी दिलेली फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे लिहिण्यात आलेला आहे व तो खरा व बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी १५** देण्यात येते. आता मला प्रथम खबर अहवाल दाखवला. त्यावर देखील माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रथम खबर अहवालला **निशाणी १६** देण्यात येते. पोलीसांनी

मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. न्यायालयात देखील माझे बयान नोंदवण्यात आले होते. *(दोन्ही पक्षांच्या समक्ष अभिलेखावरील दाखल बंद लिफाफा उघडण्यात आला. त्यामध्ये फिर्यादीचे नावाने फौ.प्र.सं. कलम १६४ नुसार मुळ बयान मिळुन आले.)* आता मला न्यायालयात नोंदवलेले माझे फौ.प्र.सं. कलम १६४ नुसार मुळ बयान दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर बयानला **निशाणी १७** देण्यात येते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपींतर्फे ॲड. एस.के. पुराडउपाध्याय यांच्या तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपावेतो तहकुब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ३०.१०.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.